**Dr. Kirit Somaiya**
**B.Com, FCA, Ph.D.**
**Ex-Member of Parliament**
*Member, BJP National Executive*
*Vice President, BJP Maharashtra*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

प्रसिद्धीसाठी

नोव्हेंबर १३, २००८

## सर्वोच्च न्यायालयाची सीइसीची खाजगी वन जमीनीवरील ४.५ लाख रहिवाशांप्रती सहानुभूती

सेंट्रल एम्पॉवरमेंट कमिटीने, दिल्ली येथे ११ नोव्हेंबर २००८ रोजी त्यांच्या समोरील पहिल्या सुनावणीच्या वेळी ज्यांची घरे खाजगी वने म्हणून घोषित करण्यात आलेली आहेत अशा ४.५ लाख प्रामाणिक, निष्पाप रहिवाशांच्या भवितव्याविषयी चिंता व्यक्त केली आहे. कमिटीने, माजी खासदार डॉ. किरीट सोमैय्या यांना अशा जमीनीवर गेली ५ ते ५५ वर्षे असलेल्या निवासी सोसायट्या, गृहनिर्माण संकुले, घरे यांची अधिक तपशीलवार माहिती सादर करण्यास सांगितली आहे.

श्री. पी. व्ही. जयकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील आणि श्री. महेंद्र व्यास, श्री. एस. के. पटनाईक, श्री. मोहान्ती, श्री. एस. के. छडा, श्री. महाराज किशन मुट्टू, श्री. एम.पी. जीवराजका या सदस्यांचा समावेश असलेल्या सेंट्रल एम्पॉवरमेंट कमिटीने, डॉ. किरीट सोमैय्यांचे प्रदीर्घ निवेंदन शांतपणे ऐकून घेतले, चौकशी केली आणि परिस्थिती आणि उपाय यावर परस्परांत चर्चा केली. डॉ. सोमैय्या यानी कोणतीही चूक नसताना रहिवाशांना कसा त्रास भोगावा लागत आहे ते सविस्तर मांडले.

धक्कादायक बाब ही आहे कि एम्पॉवरमेंट कमिटीने वारंवार सुचवूनसुद्धा महाराष्ट्र सरकारने आपला हेका सोडला नाही आणि ४.५ लाख रहिवाशांना संरक्षण देण्याच्या प्रस्तावाला विरोध केला. महाराष्ट्र सरकारचे प्रतिनिधीत्व त्यांच्या वन खात्याच्या सचिव असलेल्या श्री. ज्वालाप्रसाद, श्री. डांगे आणि श्री. मंगरुलकर यांनी केले.

वनजमीनीवर असलेल्या सुमारे ३७०० हून अधिक इमारतींतील सुमारे ४.५ लाख रहिवाशांना सूट देण्याच्या डॉ. सोमैय्यांच्या सूचनेला कमिटीचा प्रतिसाद सकारात्मक होता. सर्वोच्च न्यायालयाला लेखणीच्या एका फटकाऱ्याने किंवा एका आदेशाने या रृहिवाशांना सूट देण्याची विनंती करता येईल. महाराष्ट्र सरकारने मात्र त्यालाही सतत विरोध केला.

डॉ. सोमैय्या, स्थानिक नगरसेवक श्री. मनोज कोटक, आणि हाऊसिंग सोसायट्यांचे प्रतिनिधी श्रीमती गिरीजा बालाकृष्णन यांनी कमिटीसमोर निष्पाप रहिवाशांच्या हालअपेष्टांची तपशीलवार मांडणी केली.

शेवटी, सीइसीने ४.५ लाख निष्पाप रहिवाशांना इतरेपेक्षा वेगळे समजण्यात यावे असे आपले मत व्यक्त केले. त्यांना एकाच फटक्यात मोकळीक द्यावी आणि दिलासा द्यावा. मुंबई उच्च न्यायालयाच्या २००५ च्या आदेशापूर्वी ज्या मालमत्ता कायदेशीर रित्या कबजात घेण्यात आल्या होत्या त्याना एकाच आदेशाने दिलासा देण्यात यावा.

सुनावणीच्या वेळी विविध बिल्डर्स आणि विकासकांचे प्रतिनिधीही हजर होते. त्यांचा विषय सीइसी २५ नोव्हेंबर रोजी स्वतंत्रपणे हाताळणार आहे.

*प्रसिद्धी सचिव*

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001
➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152
(M)9869220027 ● Fax : 21637432 - Email: kirit@vsnl.in, neelamnagar@rediffmaill.com
Website : www.kiritsomaiya.com